MAKE MY DREAM FOUNDATION

A Completeness with unlimited abilities...

# यांना गरज आहे एका संधीची...



www.makemydream.org.in



## पार्श्वभूमी

'Make My Dream Foundation' ही संस्था पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट असून, २७ मार्च २००९ रोजी अस्तित्वात आली. संस्थेची नोंदणी बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट, १९५० नुसार झालेली आहे. अपंग व्यक्तींच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करणे व त्यासाठी पायाभूत सुविधांची निर्मिती, साधनांचा विकास करणे हेच संस्थेचे प्रमुख ध्येय आहे.

आपलं जगणं व शरीर निरोगी असावं, ही प्रत्येक व्यक्तीची नैसर्गिक इच्छा असते. पण काहींच्या आयुष्यात जन्मजात / अपघाती शारीरिक व्यंग येते अन् आयुष्याच्या या खडतर वाटचालीचे ओझे वाटायला लागते. जीवन एक शारीरिक, मानसिक वेदनायुक्त निरस प्रवास होऊन जातो. परंतु काही जण विलक्षण जिद्द, आशावादी वृत्ती व अपार कष्ट यांच्या बळावर त्यांच्या उणिवांवर मात करून आयुष्याची वाटचाल यशस्वी करतात. संस्थेच्या संस्थापिका मेधा कुलकर्णी या जन्मजात अपंगत्वाशी अविरत लढा देत आहेत. आई–वडील, कुटुंबीय व अनेक व्यक्तींचे जीवनात लाभलेले मार्गदर्शन, आध्यात्मिक व अंगभूत परोपकारी वृत्ती या गुणांमुळे त्यांच्या आयुष्याची खडतर वाटचाल सुलभ होण्यास मोठी मदत झाली. मेधाला आत्मनिर्भर बनवण्यासाठी तिला सामान्य मुलांप्रमाणेच वाढवण्याचा तिच्या आई–वडिलांचा दृष्टिकोन अतिशय महत्त्वपूर्ण ठरला. आपल्यासारख्या इतर समदु:खी व्यक्तींनी स्वावलंबी व आत्मनिर्भर व्हावे, याची जाणीव तिला अस्वस्थ करू लागली. तिचा जीवनप्रवास 'Make My Dream Foundation' च्या निर्मितीचा प्रेरणास्रोत आहे.

## संस्थेची उद्दिष्टे

अपंग व्यक्तींना (ज्यांचा उल्लेख आम्ही असाधारण मुले असा करतो) स्वप्न निर्मितीची प्रेरणा देऊन, स्वप्नपूर्ततेसाठी अविरत प्रयत्न करायला लावणे.

या बहुतेक मुलांमध्ये बुद्धिमत्ता व अव्यक्त गुणकौशल्ये दडलेली असतात. याच गुणकौशल्यांचा व बुद्धिमत्तेचा उपयोग करून त्यांना आयुष्यात स्वावलंबी व आत्मनिर्भर बनविणे, हेच संस्थेचे प्रमुख स्वप्न आहे. या मुलांना योग्य संधी व परिपूर्ण मार्गदर्शन मिळाले तर हीच मुले आश्चर्यकारक व्यक्तिमत्त्व विकासाबरोबरच स्वावलंबी व आत्मनिर्भर आयुष्य घडवू शकतात, असा आम्हाला विश्वास वाटतो. अशा अनेक असाधारण मुलांच्या शिक्षण, नोकरी, तसेच सामाजिक समावेशाबाबत असलेली समाजाची उदासिनता आमूलाग्र बदलणे व त्यांचे पुनर्वसन हेच संस्थेचे प्रमुख ध्येय होय.

आमची संस्था सरकार, धर्म तथा कुठल्याही राजकीय पक्षाशी संलग्नित नसून संस्थेचे कार्य ना नफा या तत्त्वावर आधारित आहे.



## संस्थेच्या कार्याची मुख्य तत्त्वे

- या असाधारण मुलांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देणे.
- ''स्वावलंबन'' तत्त्वावर आधारित वैशिष्ट्यपूर्ण समुपदेशन.

## संस्थेचे उपक्रम

### वैशिष्ट्यपूर्ण समुपदेशन

- या असाधारण मुलांच्या मनामध्ये स्वतंत्र व आत्मनिर्भर आयुष्य जगण्यास आवश्यक असलेला स्वाभिमान व स्वावलंबनाची सवय विकसित करणे.
- वैशिष्ट्यपूर्ण मनोविश्लेषणातून विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांचा शोध घेऊन, या गुणांचा वापर त्यांचा प्रगतीचा आलेख उंचावण्यासाठी करणे.
- विद्यार्थ्यांच्या मनामध्ये सामाजिक बांधीलकीची जाणीव निर्माण करणे व इतर असाधारण मुलांच्या उन्नतीसाठी कामाची प्रेरणा सतत जागृत ठेवणे.
- विद्यार्थ्यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्व विकासासाठी तज्ज्ञ व्यक्तींकडून व्याख्यान / समुपदेशनाद्वारे वेळोवेळी मार्गदर्शन.
- पाल्याच्या मानसिक, शारीरिक अडचणी समजण्यासाठी पालकांना मदत करून, अशा पाल्याचे परिपूर्ण व्यक्तिमत्त्व घडवणे साध्य केले जाईल.
- निरोगी आयुष्यासाठी शारीरिक शिक्षणाचे महत्त्व, मनाच्या आरोग्यासाठी योगोपचार, आध्यात्म इ. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून साध्य केल्या जातील.

यशस्वी आयुष्यासाठी मनाचे आरोग्य अत्यंत महत्त्वपूर्ण असते. या असाधारण मुलांना सुदृढ शरीर दुर्लभ असते व तेच मनाचे आरोग्य बिघडायला प्रामुख्याने कारण ठरू शकते. या नकारात्मक विचारावर मात करून, यशस्वी आयुष्याच्या वाटचालीचा पाया समुपदेशनाच्या माध्यमातून साध्य करणे, हा आमचा अविरत प्रयत्न असेल.









### व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र

प्रशिक्षणाचा कार्यक्रम विद्यार्थ्यांचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व व आवडीनुसार ठरविणे, हेच व्यावसायिक प्रशिक्षण केंद्राचे वैशिष्ट्य होय. आजच्या बेरोजगारीच्या वाढत्या समस्येवर नोकरी मिळविण्याची निश्चिंतीसाठी व्यावसायाभिमुख शिक्षणाचा प्रामुख्याने विचार केला जातो.

- MITCON, ITI, CDAC, CUMMINS इ. नामांकित संस्थांद्वारे आयोजित केलेले विविध व्यावसायिक अभ्यासक्रम.
- पुण्याबाहेरील विद्यार्थ्यांसाठी राहण्याची, तसेच प्रवास खर्चाची सोय.
- प्रशिक्षण कालावधीतील प्रवास खर्चाची सोय.
- प्रशिक्षण घेतलेल्या क्षेत्रामध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेण्याची संधी.
- व्यवसाय करू इच्छिणाऱ्यांसाठी कमी व्याजाने कर्जाचा प्रयत्न.

### पात्रता निकष

- विद्यार्थ्यांचे वय १५ ते ३० वयोगटातील असावे व किमान १० वी पास, आर्थिकदृष्ट्या दुर्बल असावा/वी.
- संस्थेने सोय केलेल्या ठिकाणी स्वतंत्रपणे राहणे व किमान दैनंदिन कार्यक्रम दुसऱ्याच्या मदतीशिवाय करता येणे आवश्यक व मार्गदर्शनाचा लाभ स्वप्रगतीसाठी करण्याची मानसिक सक्षमता विद्यार्थ्यांमध्ये असावी.

## प्रस्तावित प्रकल्प

### पुनर्वसन केंद्र

संस्थेच्या योजनेप्रमाणे पुढील २-३ वर्षाच्या कालावधीत असाधारण मुलांच्या शिक्षण, आरोग्य या मूलभूत गरजा भागवून त्यांचे सक्षमीकरणासाठी सुयोग्य पुनर्वसन केंद्राची निर्मिती करणे हे होय.

- योग्य अशी राहण्याची व्यवस्था.
- नामांकित संस्थांद्वारे मुलभूत, तसेच व्यावसायिक/उच्च शिक्षणाची सोय.
- अपंगत्वाची तीव्रता कमी करण्यासाठी शस्त्रक्रिया, फिजिओथेरेपी, उपचार, तसेच कृत्रिम साधनांद्वारे मुलांचे चलनवलन व कार्यक्षमता वाढविण्यासाठी नामांकित हॉस्पिटल्स, डॉक्टर्सचे मार्गदर्शन.
- ग्रंथालय, कला, क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम, मनाच्या आरोग्यासाठी योगोपचार, निरोगी आयुष्यासाठी शारीरिक शिक्षण अशा सर्व सुविधा.
- व्यक्तिमत्त्व व सर्वांगीण विकासासाठी वैशिष्ट्यपूर्ण समुपदेशन केंद्र.

पुनर्वसन केंद्रासाठी मिळणारी आर्थिक मदत प्रकल्प कार्यान्वित होईपर्यंत 'विशिष्ट कारणासाठी उभारलेला निधी' म्हणून स्वीकारत आहोत. संस्थेच्या वेबसाईटवर www.makemydream.org.in संस्थेच्या चालू, तसेच प्रस्तावित प्रकल्पांची अद्ययावत माहिती पुरविण्यात येईल.



## आवाहन

चला तर मग !!! आपण सर्वजण एकत्र येऊन या असाधारण मुलांची स्वप्ने पूर्ण करण्याचा प्रयत्न करू. त्याचबरोबर त्यांच्या मूलभूत हक्कांची जोपासना करून त्यांच्या स्वावलंबी व आत्मनिर्भर आयुष्य जगण्याच्या या प्रयत्नात महत्त्वपूर्ण योगदान देऊ या.

आयुष्य किती सुंदर आहे व आयुष्याच्या प्रवासात किती वैविध्यपूर्ण छटा असतात, यांची त्यांना जाणीव करून देऊन त्यांच्या आयुष्यात विविध सुंदर रंगांची उधळण करू या. यशस्वी आयुष्याची वाटचाल करताना नवनवीन क्षितीजांची त्यांना ओळख करून देऊ या. समाजाचा या मुलांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलून त्यांचा समाजात एक सर्वसामान्य व्यक्ती म्हणून समावेश करताना त्यांना वेगवेगळ्या संधी उपलब्ध करून देऊ या. प्रत्येकजण जमेल त्या परिने ह्या मुलांसाठी थोडा वेळ किंवा आर्थिक मदत देऊन संस्थेच्या या उपक्रमात आपले महत्त्वपूर्ण योगदान करू शकतो.

**आपण आम्हांस खालील प्रकारे आर्थिक साहाय्य करू शकता !**

| एका मुलामागे संस्थेस येणारा अंदाजे खर्च | मुदत १ – ६ महिने |
|---|---|
| कोर्स फी | रु. ५,००० – ४०,००० |
| राहण्याची व जेवण्याची व्यवस्था | रु. ६,००० – ४०,००० |
| प्रवासखर्च | रु. ३,००० – २०,००० |

देणगी ची रक्कम Make My Dream Foundation च्या नावाने डिमांड ड्राफ्ट / चेकने देऊ शकता, अन्यथा नेट बँकिंगद्वारे ऑनलाईन ट्रान्सफर करू शकता.

**संस्थेला दिलेली देणगी आयकर कायदा १९६१, नियम ८०जी अंतर्गत करसवलतीसाठी पात्र आहे.**








## ध्येयसंकल्प (Vision)

Make My Dream Foundation ही संस्था या असाधारण मुलांना सन्मानपूर्ण व आत्मनिर्भर आयुष्य जगण्याची संधी उपलब्ध करून देते व याच ध्येयाने प्रेरित असलेले अनेक निष्ठावान कार्यकर्ते संस्थेचा हा उपक्रम अविरत राबवित आहेत.

हेच ध्येय एक प्रमुख पाया मानून कार्य करणारी पुढील पिढी संस्थेकडून मदत घेऊन स्वावलंबी बनलेल्या याच असाधारण मुलांमधून घडवण्याचा संस्थेचा मानस आहे. ही असाधारण मुले स्वानुभवामुळे अधिक निष्ठेने व आंतरिक प्रेरणेने संस्थेचा हा उपक्रम पुढे चालू ठेवतील व आपल्यासारख्याच असंख्य असाधारण मुलांचे आधारस्तंभ बनतील.

संस्थेकडून मदत घेतलेल्या अशा असंख्य असाधारण मुलांच्याच मदतीने समाजाचा या मुलांकडे बघण्याचा दृष्टिकोन तसेच त्यांचा समाजात सन्मानपूर्वक समावेश यासाठी सामाजिक प्रबोधन करून अधिकाधिक यशस्वी आयुष्ये घडविण्यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील राहू.

MAKE MY DREAM FOUNDATION

A Completeness
with unlimited abilities...

1533, Sadashiv Peth
Shivsagar Apts. Second Floor
Tilak Road, Pune 411030
Phone: 91-20-24479260
Cell.: 91-9850091591
info@makemydream.org.in
www.makemydream.org.in

Regn. No.: E 5330 (Pune), Under Bombay Public Trust Act, 1950.
PN/CIT-I/Regn./12A(a)/5/2010-11 & PN/CIT-I/80G/197/2010-11/2953
Under Income Tax Act, 1961

G'NIUS GRAFIKS # 24479260